# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १६७-२३** **दिनांक :- २४/०५/२०२३**

## एप्रिल महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक १०/०२/२०२३ रोजी फिर्यादी नामे श्रीमती किरण अशोक मगिया, वय ६२ वर्षे, रा. रो हाऊस नं.५, शक्ती विलाज, हुसेन कॉलनी, बंगली रोड, वसई प. हया त्यांचे सुनेबरोबर स्कुटीवरुन त्यांचे राहते घरातुन जैन मंदिर, वसई प. या ठिकाणी कार्यक्रमासाठी जात असताना पहाटे ०६.०० वा. चे सुमारास शाओमी एम.आय.चे शोरुम समोर, माणिकपुर नाका, वसई प येथे आल्या असता त्यांचे पाठीमागील बाजुने एक दुचाकी मोटार सायकल स्वार त्यांचे स्कुटीच्या डाव्या बाजुने त्यांचे जवळ आला व मोटार सायकलवर पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे गळ्याजवळ हात मारुन त्यांची सोन्याची चैन जबरीने खेचुन बाईकने अंबाडी सिग्नलकडे भरधाव वेगाने निघून गेल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं I ४६/२०२३ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ अन्वये दिनांक १०/०२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता.

चैन स्नॅचिंग गुन्हयांना आळा घालून घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त महितीच्या व तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे अब्बास अमजद ईराणी, वय २४ वर्षे, रा. फातिमा मंजील, भास्कर शाळेचे समोर आंबिवली, पाटील नगर, ता. कल्याण, जिल्हा ठाणे यास निष्पन्न करुन त्याच्या आंबिवली ईराणी वस्तीमधील दैनंदिन दिनक्रमाबाबत माहिती घेवून यापुर्वी ईराणी वस्तीमध्ये आरोपीत पकडणेस गेलेल्या तपास पथकावर हल्ला होण्याच्या ब-याच घटना घडलेल्या असतानाही सर्व बाबींची योग्य सांगड घालुन सापळा करवाई करुन आरोपीतास दिनांक ०४/०४/२०२३ रोजी ताब्यात घेतले व त्याचेकडुन तपासा दरम्यान **चैन स्नॅचिंगचे व फसवणुकीचे एकूण १६ गुन्हे उघडकीस** आणुन वर नमुद गुन्हयात चोरी करणेकरीता वापरलेल्या मोटार सायकल सहीत गुन्हयात **चोरीस गेलेले ८७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ३,३१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** केला आहे.

सदरची कामगिरी करणारे **गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनीटचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे,** स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, मंगेश चव्हाण, संजय किसन नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा नेमणुकीतील पो.हवा. बापु पवार, राजेश पद्मने, महेंद्र शेट्ये तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांचा दिनांक २४/०५/२०२३ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय,

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ एप्रिल महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक - १** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना सपोनि श्री. सुहास कांबळे**

**२)** नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक २२/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे संकेत विष्णु मोहिते, रा.नालासोपारा हे त्यांचे ॲक्टीवा मोटार स्कुटरवरून घरी जात असताना इसम नामे पॉल नाडर यांनी फिर्यादीचे मोटार स्कुटरचे लोनचे हप्ते प्रलंबित असल्याचे कारण सांगुन फिर्यादीची स्कुटर एल. अँड. टी. या फायनान्स कंपनीमध्ये जमा करावयाची आहे असे सांगुन नमुद स्कुटर ही कंपनीमध्ये जमा न करता ती परस्पर विक्री करून त्यांचे स्कुटरचा अपहार करून फसवणुक केलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक १४/०४/२०२३ रोजी तक्रार दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २१७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा कक्ष २ वसई हे समांतर तपास करीत असताना सदर गुन्हयाबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) पॉल मुर्गन अनबल्ग्न नाडर २) सलमान हनीफ शेख ३) सुधांशु ममुराली कनोजिया सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेवनु तपास केला असता सदर अरोपीत यांनी आपसात संगणमत करुन वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १६/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली व त्यांच्याकडे केलेल्या तपासात त्यांनी अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीत यांनी परस्पर अपहार केलेल्या व विक्री केलेल्या १०,९०,०००/- रुपये किंमतीच्या एकुण १७ दुचाकी हस्तगत करण्यात आलेल्या आहेत तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी एकुण १०,५०,०००/- रुपये किंमतीच्या १७

दुचाकी हस्तगत केल्या आहेत. अशा प्रकारे **संयुक्त कारवाई दरम्यान नमूद आरोपीतांकडून आतापर्यंत २१,४०,०००/- रुपये किंमतीच्या एकुण ३४ दुचाकी हस्तगत** करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कामगिरी करणारे **नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. विलास सुपे,** पो.नि. राहुल सोनावणे गुन्हे, स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, सचिन कांबळे, पो.ना. प्रशांत साळुंखे, अमोल तटकरे, पो.अंम. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, पोना/ढोणे नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, म.सु.ब. मनोज पाटील तसेच **गुन्हे शाखा, कक्ष २, वसईचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे,** स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, मंगेश चव्हाण, रमेश भोसले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" एप्रिल महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. विलास सुपे व स.पो.नि. श्री. सुहास कांबळे.**

३) काशिमिरा पोलीस ठाणे, गु.रजि.नं I २४०/२०२३ भादवि कलम ४६१, ३७९ मधील फिर्यादी यांनी ट्रान्सपोर्ट कंपनीचा टेम्पो क्र. MH/ 04/KU/5292 हा ता.म.वेळी व जागी पार्कीग केला असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने खोडसाळपणे त्याचे मागील दरवाजाचे लॉक तोडुन त्यातील एकुण २१,९१,७०२.१६/- रुपये किंमतीचे मोबाइल तसेच इलेक्ट्रीक सामान (ॲसेसरीज) चोरी करुन नेले बाबत अज्ञात चोरटयाविरुध्द फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपी विशाल रमेश राजभर, वय २० वर्षे याचेबाबत मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक विश्लेषणाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करुन त्याचे वलसाड, गुजरात येथील लोकेशन प्राप्त केले व त्यास सिव्हील हॉस्पीटल, वलसाड, गुजरात येथून ताब्यात घेतले. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याचे साथीदार (१) आकाश सुशील मंडळ, रा. पेणकरपाड, मिरारोड पुर्व. (२) मुश्ताक, रा. पालघर पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांचे सोबत मिळुन चोरी केल्याचे सांगून नमूद आरोपीताकडून **गुन्हयात चोरीस गेलेला रु.२१,५८,९२४.५९ किंमतीचा मुददेमाल हस्तगत** करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे **काशिमिरा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदीप कदम,** पोनि. श्री. विजय पवार, (गुन्हे), सपोनि. प्रशांत गांगुर्डे पोउनि. प्रकाश कावरे, सफौ अनिल पवार, पोहवा/ सचीन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पोशि. रविंद्र कांबळे, प्रविण टोबरे सर्व नेम-काशिमीरा पोलीस ठाणे. व पोहवा. जयप्रकाश जाधव, नेम. पो.उप. आयुक्त, परि.१ कार्यालय यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ एप्रिल महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल”** क्रमांक - ३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. संदीप कदम**

४) दिनांक २४/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी राजीव ओमप्रकाश मेहरा हे त्यांचे राहते घर बंद करुन, कामानिमीत्त बाहेर गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांच्या घराचा टेरेसचा दरवाजा कापून आतमध्ये प्रवेश करुन, बेडरुम मध्ये असलेल्या कपाटाचा दरवाजा कशानेतरी कापुन, कपाट उघडून, कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम रुपये ७०,००,०००/- व सोन्या-चांदीचे दागिणे असा एकूण ७०,१२,०००/- रुपये किंमतीचा माल लबाडीच्या इरादयाने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत मिरारोड पोलीस ठाणे

येथे गु.र.नं. १५२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी समांतर तपास करुन तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपी संजीवकुमार सदानंद सिंह, रा. शितलनगर, मिरारोड पूर्व यास निष्पन्न केले व त्यास दिनांक २५/०४/२०२३ रोजी अटक करुन त्याचेकडून घरफोडी चोरी करुन नेलेली एकूण रुपये ७४,५०,०००/- रोख रक्कम व १२,०००/- रुपये किंमतीचे १) सोन्याची बाली २) चांदीचा कॉईन (नाणे) असा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी करणारे **गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिराचे पो.नि. अविराज कुराडे,** स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पोहवा. अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पोशि. प्रशांत विसपुते, सफौ. संतोष चव्हाण / सायबर शाखा यांचा **“ एप्रिल महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.१ ”** देवुन मा. पोलीस आयुक्त यांनी सत्कार केला.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. अविराज कुराडे**

**५)** दिनांक २२/०३/२०२३ रोजी रात्रौ. ०७:०० ते ०७.४५ वाजताचे दरम्यान फिर्यादी नामे श्री. रोहीत रामानंद राय, वय १९ वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. धानीवबाग तलाव, धानीवबाग, नालासोपारा पूर्व, ता. वसई हे हिताची एटिएम, धानीवबाग तलावाचे समोर, धानीव बाग, नालासोपारा पुर्व, येथे एटीएम सेंटर मधुन पैसे काढण्यासाठी गेले असता दोन अनोळखी इसमांनी आपसात संगणमत करुन एटीएम सेंटरमध्ये येवून फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन फिर्यादीचे एटीएम त्यांचे संमतीशिवाय लबाडीने घेवून फिर्यादीचे परस्पर ४४,०००/- रुपये काढले तसेच एटीएम सेंटरमध्ये आलेल्या आणखी एका इसमाचे १९,०००/- रुपये काढुन फसवणुक केल्याबाबत

फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर २८८/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासुन एटीएम सेंन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन फिर्यादीचे परस्पर एटीएम मशीन मधुन पैसे काढुन घेतलेबाबतच्या घटनेत वाढ झाली होती. सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना व आदेश दिले होते.

त्याअनुषंगाने वर नमुद गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांचेकडे सोपविण्यात आला होता. गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख व स्टाफ यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत नामे १) साहील सलीम शेख, रा. ॲन्टॉपहिल, मुंबई. २) सागर अभिजीत मंडल, रा. बांद्रा पुर्व, मुंबई यांस ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात दिनांक ०४/०४/२०२३ अटक करुन त्यांचेकडुन गुन्हयात वापरण्यात आलेली बर्गमॅन मोटार सायकल व गुन्हयातील फसवणुक झालेली १,५०,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करुन फसवणुकीचे एकूण ६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी करणारे **गुन्हे शाखा, कक्ष ३ चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख,** पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सुब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर गुन्हे शाखा यांचा **" एप्रिल महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड २"** देवुन मा. पोलीस आयुक्त यांनी सत्कार केला.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि. श्री. प्रमोद बडाख**

६)  वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिवसा व रात्री चोरी  व घरफोडी चोरींच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याने सदर गुन्हयांना पायबंद घालून गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) भावेश महेश वेदक, वय २२ वर्ष, रा. चिंचपाडा, वालीव, वसई (पुर्व), २) बद्रीआलम अकलाख चौधरी ऊर्फ पप्पु, वय ३० वर्ष, रा. रामरहीम चाळ, मोर्या नाका, सातिवली वसई यांना दिनांक ०७/०४/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला व त्यांचेकडून वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत दिवसा / रात्रौ घडलेले घरफोडी चोरीचे एकूण १० गुन्हे उघडकीस आणून गुन्हयात चोरीस गेलेले सोन्याचे दागिने व इतर वस्तु असा एकुण ०३,४२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी करणारे **वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे,** पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.ना. बाळु कुटे, पो.अंम.गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांचा **"एप्रिल महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.३"** देवुन मा. पोलीस आयुक्त यांनी सत्कार केला.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. कैलास बर्वे**

**------000------**